
# दि नंदुरबार मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. नंदुरबार




## तिसावा वार्षिक अहवाल
## सन २०२४ - २०२५

RBI Lic. No.: UBD / MH / 1108 / P Dt. 07-01-95
Reg. No.: DLE / BNK(O) / 101 / 94-95 / Dt. 28-09-94



**श्री. किशोरभाई वाणी**
संस्थापक चेअरमन



**श्री बळवंतबापू जाधव**
व्हा.चेअरमन
प्रकाशा शाखा चेअरमन



**सौ. उमाबेन के. वाणी**
संचालिका



**सौ. कविताबेन पी. चौधरी**
संचालिका



**श्री राजेंद्रभाई जैन**
संचालक व शहादा शाखा चेअरमन



**श्री दिलीपभाई शाह**
संचालक व तळोदा शाखा चेअरमन



**श्री राजेंद्रभाई शाह**
संचालक व निजामपुर शाखा चेअरमन



**श्री जयेशभाई दवे**
संचालक



**श्री राजेंद्रभाई अग्रवाल**
संचालक



**श्री सिद्धार्थभाई वाणी**
संचालक



**श्री सुरेशकुमार जैन**
संचालक




**श्री मच्छिंद्रभाई मगरे**
संचालक



**श्री प्रमोदभाई पाटील**
संचालक



**श्री धिरजभाई जयस्वाल**
संचालक



# भारताचे रतन

ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांचे ९ ऑक्टोबर २०२४ रोजी वयाच्या ८६व्या वर्षी निधन झाले. रतन टाटा यांचे नाव भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल. भारतात ज्यावेळी उद्योगपतींचा उल्लेख होतो. रतन टाटा यांचे नाव प्रथम घेतले जाईल. आपल्या जीवनाच्या प्रवासात त्यांनी अनेक ऐतिहासिक कामे केली.

खरे तर रतन टाटा यांना भारतीय उद्योगाचे जनक देखील म्हटले जाते. त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाने लोकांना प्रभावित केले. त्यांनी या जगाला अनेक मौल्यवान भेटवस्तू दिल्या. त्यांचे योगदान आज भारतासह संपूर्ण जगासाठी एक उदाहरण आहे. राष्ट्र उभारणीत रतन टाटा यांचे अगणित योगदान आहे, जे विसरता येणार नाही. पण त्यांच्यापैकी काही योगदान असे आहे ज्यांनी काळाच्या क्षितिजावर छाप सोडली आहे. ज्या वेळी संपूर्ण जग कोरोनासारख्या महामारीशी झुंजत होते, त्याच वेळी भारतही आरोग्याच्या संकटाशी लढत होता. या संकटाच्या काळात रतन टाटा पुढे आले आणि त्यांनी देशाला ५०० कोटी रुपयांची मदत दिली. त्यांनी ट्वीटर वर लिहिले की, कोविड-१९ हे आपल्यासमोरील सर्वात कठीण आव्हानांपैकी एक आहे. टाटा ट्रस्ट आणि टाटा समूहाच्या कंपन्या भूतकाळातही देशाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुढे आल्या आहेत. या वेळेची गरज इतर वेळेपेक्षा जास्त आहे.

रतन टाटा त्यांच्या सौम्य स्वभावासाठी आणि उदार हृदयासाठी ओळखले जात होते. त्यांना श्वानांची खूप आवड होती. काही दिवसांपूर्वीच त्यांनी श्वानांसाठी रुग्णालय उघडले. रुग्णालयाचे उद्‌घाटन करताना ते म्हणाले होते की, मी श्वानांना माझ्या कुटुंबाचा भाग मानतो. रतन टाटा पुढे म्हणाले होते की, मी माझ्या आयुष्यात अनेक पाळीव प्राणी पाळले आहेत. यामुळे मला हॉस्पिटलचे महत्त्व कळते. त्यांनी नवी मुंबईत बांधलेले रुग्णालय पाच मजली असून, त्यामध्ये एकाच वेळी २०० पाळीव प्राण्यांवर उपचार करता येतात. हे रुग्णालय १६५ कोटी रुपये खर्चुन बांधण्यात आले आहे.

रतन टाटा यांचे पाळीव प्राण्यांबद्दलचे प्रेम यावरूनही समजू शकते की ते एकदा श्वानाला मिनेसोटा विद्यापीठात घेऊन गेले होते. जिथे श्वानाची जॉइंट रिप्लेसमेंट करण्यात आली. टाटा समूह पूर्वी फक्त मोठ्या वाहनांच्या निर्मितीसाठी ओळखला जात होता. पण १९९८ मध्ये रतन टाटा यांनी छोट्या वाहनांच्या जगातही प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आणि त्यांनी टाटा इंडिका बाजारात आणली. टाटा इंडिका ही पूर्णपणे स्वदेशी कार होती. याने विक्रीचे सर्व रेकॉर्ड मोडून बाजारात नवा विक्रम प्रस्थापित केला. सुमारे एक दशकानंतर, टाटांनी आणखी एक प्रयोग केला आणि २००८ मध्ये त्यांनी नॅनो कार बाजारात आणली.

टाटांनी जागतिक स्तरावरील देखील मोठा ठसा उमटवला आहे. टाटा समूह ' जॅग्वार ' आणि ' लँड रोवर ' सारख्या जगप्रसिद्ध ब्रँडच्या कारचं उत्पादन करतो. तर 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस' जगातील सर्वात प्रसिद्ध सॉफ्टवेअर कंपन्यांपैकी एक आहे. ज्याची किंमत १ लाख रुपयांपेक्षा कमी होती. जेव्हा लोक भारतातील सॉफ्टवेअर कंपन्यांचा उल्लेख करतात तेव्हा त्यांच्या मनात पहिले नाव येते ते म्हणजे ' टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस '. TCS ही जगातील सर्वात मोठी माहिती तंत्रज्ञान आणि आउटसोर्सिंग सेवा कंपन्यांपैकी एक आहे. ज्याने तंत्रज्ञान क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानासोबतच मोठ्या प्रमाणावर रोजगारही निर्माण केला आहे. हे सर्व उभं करण्यामागील रतन टाटांचं योगदान नेहमीच लक्षात ठेवलं जाईल. भारतीय संस्कृतीत परोपकार, निस्वार्थपणा, साधेपणा, सामाजिक बांधिलकी, नम्रपणा या मूल्यांना प्रचंड महत्त्व आहे. यशाच्या शिखरावर असताना आणि देशातील सर्वात मोठ्या उद्योगसमूहाच्या प्रमुखपदी असूनही रतन टाटा नावाच्या एका अद्भूत माणसाच्या अंगी या सर्व गुणांचं प्रकटीकरण झालेलं होतं. म्हणूनच उद्योगविश्वातील त्यांच्या योगदानाबरोबरच एक उत्तम माणूस म्हणून त्यांनी समाजात दिलेलं योगदान भारतीय समाज कधीच विसरू शकणार नाही.

## मर्चन्टस् परिवारातर्फे विनम्र आदरांजली




अहवाल वर्षात देशातील इतर राजकिय, सामाजिक, सहकार,
कला व साहित्य क्षेत्रातील कार्यकर्ते, थोर नेते, संशोधक,
देश रक्षणासाठी सीमेवर शहीद झालेले वीर जवान, पोलिस अधिकारी,
आरोग्य अधिकारी व कर्मचारी, नाट्य व सिनेकलावंत,
पहलगाम येथील आतंकी हल्ल्यात मरण पावलेले निष्पाप नागरिक,
या सर्वांच्या कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.
तसेच गतवर्षात नंदुरबार शहरातील जे नागरीक, सभासद, ठेवीदार,
खातेदार, ज्ञात अज्ञात बंधु भगिनी पंचत्वात विलीन झाले.
परम पिता परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.
त्यांच्या पवित्र स्मृतीस मर्चन्टस् परिवारातर्फे भावपूर्ण आदरांजली.

## बँकेचे मागील बहुमान

१. महाराष्ट्र शासना तर्फे 'सहकार निष्ठ' हा मानाचा पुरस्कार दि.१९/०६/२०१५ रोजी कोल्हापुर येथे मिळाला.
२. बँको पुरस्कार २०१३- महाबळेश्वर येथे दि.४/१२/२०१३ रोजी वितरण. मा.चेअरमन व संचालक मंडळाचा सहभाग
३. न्युबा ॲवार्ड - नाशिक अर्बन बँक्स असोसिएशन तर्फे दि.१७ जानेवारी २०१४ रोजी बेंगलुरु येथे वितरण
४. इन्टेलेक्चूअल पीपल्स फाऊंडेशन व नॅशनल अचीव्हअर्स रेकग्निशन फोरम, नवी दिल्लीच्या वतीने सन २०२१ साठी 'बेस्ट चेअरमन इन को-ऑपरेटिव्ह बँक डेव्हलपमेंट'
५. राष्ट्रीय पातळीवरील 'बँको ब्ल्यू रिबन २०२३ बेस्ट बँक' या पुरस्काराने दमण येथील सोहळ्यात गौरविण्यात आले.
६. मिनीस्ट्री ऑफ कम्युनिकेशन, भारत सरकार यांच्या तर्फे 'बेस्ट अर्बन को-ऑप बँक' भारतरत्न सहकारीता पुरस्कार (सन २०२४-२५)

## मान्यवर सभासदांशी हितगुज

१. आयकर खात्यातील बदलानुसार खातेदारांचा कोणत्याही खात्यात असलेल्या डिपोझीटवर मिळणाऱ्या ४० हजारापेक्षा जास्त व्याजातुन टी.डी.एस. कपात अनिवार्य आहे. तरी ठेवीदारांनी आपले पॅनकार्ड, फॉर्म १५ जी / १५ एच वेळेत बँकेत दाखल करणे. ठेवीदारांनी याची काळजी ध्यावी.
२. आपल्या बँकेच्या नंदुरबार, निजामपुर, प्रकाशा, तळोदा, शहादा व सिंधी कॉलनी शाखेतून बँकिंग सेवेचा लाभ ध्यावा.
३. कोअर बँकिंगद्वारे बँकेचा कोणत्याही शाखेत व्यवहार करण्याची सुविधा
४. पत्ता बदललेला असल्यास कृपया आपल्या जवळच्या शाखेत संपर्क साधावा व पत्र व्यवहार करावा.
५. स्टॉक स्टेटमेंट दर महा ५ तारखेच्या आत सादर करा अन्यथा २% जादा दंडात्मक शुल्क आकारण्यात येईल.
६. बँकेच्या ५ लाखापर्यंतच्या सर्व ठेवींना ठेव विमा महामंडळाकडून संपूर्ण संरक्षण आहे व प्रिमीयम भरणा नियमित आहे.
७. बँकेच्या सेफ डिपॉझीट लॉकर्स सुविधा सर्व शाखांमधे उपलब्ध. बँकेतील व्यवहाराच्या माहितीसाठी एस.एम.एस. अलर्ट सुविधा.
८. के.वाय.सी.नॉर्म्स पूर्ण केल्याशिवाय कोणतेही खाते उघडता येत नाही.
९. पुरेशा रकमे अभावी चेक परत जाणार नाहीत याची काळजी खातेदारांनी ध्यावी.
१०. ९७व्या घटना दुरुस्तीनुसार सभासदाची क्रियाशील व अक्रियाशील अशी वर्गवारी होत असल्या कारणाने सभासदाचे वार्षिक सभेला हजर राहणे व बँकेशी आर्थिक व्यवहार करणे आवश्यक आहे. म्हणून सभासदांनी योग्य ती खबरदारी ध्यावी.
११. बँकेच्या कामकाजाबद्दल काही अडचणी असल्यास त्वरीत कळवा. दि.१ एप्रिल ह्या वर्धापनदिनी बँकेत भेट देवून मार्गदर्शन करा.
१२. सर्व शाखांमध्ये ATM सेवा उपलब्ध. विनामुल्य ATM कार्डसाठी आपल्या जवळच्या शाखेत संपर्क साधावा.
१३. मोबाईल बँकिंग सेवा तसेच IMPS व UPI सेवा उपलब्ध असून ग्राहकांनी या सेवेचा जास्तीत जास्त लाभ ध्यावा.
१४. मागील २ वर्षापासून सर्व सभासदांसाठी 'मर्चन्टस् बँक आरोग्य योजना'ची सुरुवात झाली असून सभासदांनी लाभ ध्यावा.

## वार्षिक साधारण सभेचा अजेंडा

दि नंदुरबार मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., नंदुरबारच्या मा. सभासदांची **३०वी वार्षिक साधारण सभा दि.१७/०८/२०२५ रविवार रोजी सकाळी १० वाजता स्व. कन्हैयालाल रावजीभाई वाणी व्यापारी भुवन, मार्केट यार्ड, नंदुरबार** येथे बँकेचे संस्थापक अध्यक्ष **मा. श्री. किशोरभाई कन्हैयालाल वाणी** यांच्या अध्यक्षतेत खालील विषयांवर विचार विनीमय करणेसाठी आयोजित केलेली आहे. तरी कृपया सभासद बंधु भगिनी यांनी नियोजित वेळेत सदर सभेस उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

## सभे पुढील विषय

१. मागील सभा दि. २४-०८-२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. मा. संचालक मंडळाने अहवाल वर्षात केलेल्या कामकाजांचा आढावा घेणे.
३. दि. ३१-०३-२०२५ अखेरच्या लेखापरिक्षित आर्थिक पत्रकांना मंजुरी देणे.
४. सन २०२४-२०२५ च्या शासकिय तपासणी व दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
५. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी अंदाज पत्रक मंजुर करणे.
६. बाहेरील कर्ज उभारणीची मर्यादा ठरविणे.
७. सन २०२४-२०२५ मध्ये अंदाजापेक्षा कमी/जास्त झालेल्या खर्च/उत्पन्नास मान्यता देणे.
८. मा. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२४-२०२५ च्या नफावाटणीस मान्यता देणे.
९. बँकेचे सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी मा. रिझर्व्ह बँकेच्या परवानगीस अधीन राहून वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
१०. एकरकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत अहवाल वर्षात बंद केलेल्या कर्ज खात्यांची नोंद घेणे.
११. दि.२४-०८-२०२४ व आजच्या वार्षिक सभेला अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीला मान्यता देणे.
१२. मा. अध्यक्ष साहेब यांचे परवानगीने आयत्यावेळी येणारे विषय.

**श्री. कन्हैयालाल तुकाराम पाटील**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
दि नंदुरबार मर्चन्ट्स को-ऑप. बँक लि.,नंदुरबार

नंदुरबार
दिनांक : २५-०७-२०२५

## सभासदांना महत्वाच्या सुचना

१. गणपूर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने होईल. अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. वार्षिक सर्व साधारण सभेस काही प्रश्न उपस्थित करावयाचे असल्यास कृपया दि. १०/०८/२०२५ पर्यंत बँकेत लेखी स्वरुपात कळवावे.
३. सभासदांनी वार्षिक साधारण सभेचा अहवाल जवळच्या शाखेतून घेऊन जावे, ही विनंती.
४. बँकेचे ३१ मार्च २०२५ अखेरचे नफा तोटा पत्रक व ताळेबंद बँकेचे मुख्य कार्यालय व शाखांच्या नोटीस बोर्ड वर लावले आहे.
५. सभासदांनी त्यांचे इ मेल आय. डी. व मोबाईल नं. बँकेस कळवावे. त्यात बदल झाला असल्यास ते देखील कळवावे.
६. सभासदांची सी. के. वाय. सी. पूर्तता राहिली असल्यास लवकरात लवकर पूर्ण करावी.

## लेखा परिक्षकांचा अहवाल

**महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा १९६० कलम ८१ (५ब) व**
**महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९**

आम्ही / मी दि नंदुरबार मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., नंदुरबार, जि. नंदुरबार या बँकेचा सोबत जोडलेला दि.३१/०३/२०२५ चा ताळेबंद व सन २०२४-२०२५ या सहकारी वर्षाचे नफा-तोटा पत्रकाचे लेखा परिक्षण केले आहे. ही आर्थिक पत्रके तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. आम्ही/माझी जबाबदारी ही आम्ही/मी केलेल्या लेखा परिक्षणावरुनच संस्थेच्या व्यवस्थापनाने तयार केलेल्या आर्थिक पत्रकावर मत प्रदर्शन करणेपूरती मर्यादित आहे.

आम्ही / मी सर्व सामान्यपणे वापरल्या जाणाऱ्या लेखापरिक्षा प्रमाणकांना अनुसरुन लेखा परिक्षण केले आहे. मी अशा पद्धतीने लेखा परिक्षणाचे नियोजन करुन ते पार पाडले, की लेखा परिक्षा प्रमाणकांनुसार संस्थेची आर्थिक पत्रके ढोबळ प्रमाणात दोष विरहीत असल्याबद्दल सर्व साधारण खात्री यावी. लेखा परिक्षणात चाचणी पद्धतीने परिक्षण, रकमांच्या आधारभुत जोडपत्रे आणि आर्थिक पत्रकातील प्रगटन आदी बाबींचा समावेश आहे. लेखा परिक्षणात व्यवस्थापनाने वापरलेल्या आर्थिक तत्वांचा तसेच महत्वपूर्ण अंदाज यांचा देखील अंतर्भाव आहे. आर्थिक पत्रकांवर केलेल्या मत प्रदर्शनास मी केलेल्या लेखा परिक्षणाचा पूरेसा आधार आहे असा आम्हाला / मला विश्वास आहे.

आम्ही / मी सन २०२४-२०२५ या वर्षाचे ताळेबंद व नफातोटा पत्रक तपासले असुन अहवालाच्या अ, ब व क मधील शेऱ्यास पात्र राहुन अहवाल सादर करितो की,

१) आमच्या / माझ्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी, आमच्या / माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासा आम्हाला / मला उपलब्ध झाले आहेत.

२) आमच्या / माझ्या मते व आम्हाला / मला मिळालेल्या माहिती व खुलासानुसार संस्थेचे ताळेबंद व नफातोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकांशी जुळत असुन दिनांक : ३१/०३/२०२५ या दिनांकाचे ताळेबंद संस्थेच्या व्यवहारांची (कामकाजाची) सत्य व वास्तव परिस्थिती दर्शवितात आणि नफा तोटा पत्रक विवेचनातील शेऱ्यांना पात्र राहून त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफातोट्याची सत्य व रास्त परिस्थिती दर्शवितात.

३) संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिपणी व शेऱ्यास पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची सत्य व वास्तव परिस्थिती दर्शवितात.

४) आमच्या / माझ्या मते व शेऱ्यास पात्र राहून बँकेने महाराष्ट्र सहकारी कायदा, नियम व बँकेच्या पोटनियमानुसार आवश्यक असणारी सर्व हिशोबी पुस्तके योग्य रितीने ठेवलेली आहेत.

५) वर्ष २०२४-२०२५ या सहकारी वर्षासाठी बँकेस लेखा परिक्षण वर्ग 'अ' देण्यात आला आहे.

दिनांक : २७/०६/२०२५
स्थळ : नंदुरबार

**मे. व्ही. एस. अग्रवाल ॲण्ड कंपनी**
चार्टर्ड अकौन्टंटस्, धुळे

## दि. ३१ मार्च २०२५ अखेर संपलेल्या ३० वा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,

धन्यवाद ! धन्यवाद !! धन्यवाद !!!

आपल्या सर्वांच्या अमुल्य सहकार्याने व आशिर्वादाने महाराष्ट्र शासनातर्फे दिला जाणारा मानाचा व गौरवाचा 'सहकार निष्ठ' पुरस्कार सन २०१५ मध्ये बँकेस प्राप्त झाला होता. या पुरस्काराचे स्वरुप रोख रु. २५०००/- व मानचिन्ह असे होते.

आपल्या बँकेचा दि. ३१ मार्च २०२५ अखेर संपलेल्या ३०व्या वर्षाचा अहवाल सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे. अहवाल वर्षात सभासद व ठेवीदार यांनी मोठ्या प्रमाणात बँकींग व्यवसायात वाढ करुन बँकेच्या प्रगतीस फार मोठा हातभार लावलेला आहे. सभासदांच्या विश्वासाप्रमाणे सर्व बाबींचे पालन करणे हे आमचे कर्तव्य समजतो.

## बँकेची प्रगती – दृष्टीक्षेप

(रक्कम रु. लाखात)


| तपशिल | सन २०२०–२१ | सन २०२१–२२ | सन २०२२–२३ | सन २०२३–२४ | सन २०२४–२५ |
|---|---|---|---|---|---|
| सभासद संख्या | ५२५४ | ५२५८ | ५२२० | ५२५७ | ५२६६ |
| भागभांडवल | ४४२.५४ | ४७१.९४ | ४८४.५६ | ५०८.५६ | ५२६.९८ |
| गंगाजळी / निधी | १९७२.३७ | २०८८.४३ | २२६२.१५ | २३६०.०४ | २४८२.७३ |
| ठेवी | १३८६१.९४ | १४१९३.०३ | १३११९.४९ | १३९७९.७३ | १४२३७.३९ |
| कर्ज वाटप | ८०४३.९४ | ८६४२.४५ | ८९२१.६५ | ९७३९.७१ | १०१४८.३० |
| बाहेरिल कर्ज | --- | --- | --- | --- | --- |
| निव्वळ नफा | १४६.६६ | २०१.४५ | १७४.४० | १३५.१३ | १७६.४३ |
| डिव्हीडंड | १२% | १२% | १२% | १२% | १२% सुचीत |
| ऑडीट वर्ग | 'अ' | 'अ' | 'अ' | 'अ' | 'अ' |

## अधिकृत भाग भांडवल

अधिकृत भागभांडवल रु. ८००.०० लक्ष (रु. ८ कोटी) एवढे आहे.


## वसुल भाग भांडवल

| कालावधी | सभासद संख्या | भाग भांडवल |
|---|---|---|
| ३१ – ३ – २०२४ अखेर | ५२५७ | ५,०८,५६,०००.०० |
| सन २०२४ – २५ मधील वाढ | ८१ | २७,७६,०००.०० |
| सन २०२४ – २५ मधील घट | ७२ | ९,३३,६५०.०० |
| ३१-३-२०२५ अखेर | ५२६६ | ५,२६,९८,३५०.०० |




## गंगाजळी व इतर निधी


गतवर्षातील स्वनिधी रक्कम रु. २३६०.०४ लक्ष
अहवाल वर्षात वाढ रु. १२२.६९ लक्ष
वर्ष अखेरीस एकूण निधी रु. २४८२.७३ लक्ष
निधी वाढीचे शे. प्रमाण ५.१९ %




## ठेवी

गतवर्षातील ठेवींची रक्कम रु. १३९७९.७३ लक्ष
अहवाल वर्षात वाढ रु. २५७.६६ लक्ष
वर्ष अखेरीस एकूण ठेवी रु. १४२३७.३९ लक्ष
ठेवी वाढीचे शे. प्रमाण १.८४ %

अहवाल वर्षात ठेवींमध्ये वाढ झालेली असून सर्व शाखाधिकाऱ्यांना दिलेल्या लक्ष्यांकाप्रमाणे कामाची जबाबदारी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.




## सभासदांना कर्जवाटप

गतवर्षातील कर्जवाटप रु. ९७३९.७१ लक्ष
अहवाल वर्षात वाढ रु. ४०८.५९ लक्ष
वर्ष अखेरीस येणे कर्ज रु. १०१४८.३० लक्ष
कर्ज वाढीचे शे. प्रमाण ४.२० %

बँकेची नफा क्षमता ही प्रामुख्याने कर्ज वाटप व वसुली यावरच अवलंबुन असते. अहवाल वर्षात मिळालेल्या ठेवी व शिल्लक असलेले सरप्लस फंड्स यांचा मेळ घेवून अहवाल वर्षात कर्जवाटप केलेले आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे बँकेचे संचालक अथवा त्यांचे नातेवाईकास कर्जवाटप केलेले नाही.

अहवाल वर्षात कर्जाचे वाटपात अपेक्षेपेक्षा वाढ झालेली आहे. संचालक मंडळाने कर्ज व्याजदरात केलेल्या कपातीच्या बाबीचा विचार करुन त्याचा लाभ सर्व सभासदांनी घ्यावा अशी विनंती आहे.

## गुंतवणूक

रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे शासकिय कर्ज रोखे, एस. एल. आर. तथा नॉन एस. एल. आर. गुंतवणूक करणेत आलेली असून दि.३१/३/२०२५ अखेर एकुण गुंतवणूक रु. ५९८९.६४ लक्ष एवढी आहे.

## ठेवींना विमा संरक्षण

आपल्या बँकेच्या सर्व ठेवी इन्शुअर्ड आहेत. डिपोझिट इन्शुरन्स ॲन्ड क्रेडीट गॅरंटी कोर्पोरेशन, मुंबई हा रिझर्व्ह बँकेचाच एक स्वतंत्र विभाग असून तेथे ठेव विमा प्रिमीयम प्रत्येक सहामाही अखेर आगावू भरणा करणेत येतो. सप्टेंबर २०२५ पावेतोचा ठेव विमा हप्ता भरणा केलेला आहे. रु. ५ लक्ष ठेवीसाठी विमा संरक्षण असते म्हणून ठेवीदारांनी ठेवी ठेवतांनाच कुटूंबातील प्रत्येक व्यक्तीगत नावाने ठेव ठेवण्याबाबत आग्रही असावे.

### आर्थिक दृष्ट्या सक्षम बँक (FSWM)

आपल्या बँकेने मा. रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकाप्रमाणे आर्थिकदृष्ट्या सक्षम बँक (Financially Sound & Well Managed Bank) चे सर्व निकष पूर्ण केलेले आहे.

### थकबाकी

पुर्वीच्या काही थकित कर्जदारांवर आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे. थकित कर्जदारांना पून्हा आवाहन करणेत येते की त्यांनी त्वरीत कर्जभरणा करुन बँकेचा नावलौकिक वाढविण्यासाठी हातभार लावावा. कलम १०१ व १३८ खाली वसुली कार्यवाही सुरु आहे तसेच सिक्युटरायझेशन अॅक्ट खाली देखील काही प्रकरणांची कार्यवाही सुरु आहे.

### शाखा कामकाज

१. नंदुरबार शाखा चेअरमन श्री. किशोरभाई के. वाणी यांचे मार्गदर्शनाखाली शाखेचे कामकाज सुरळीत सुरु असून सदर शाखेला ३१ मार्च २०२५ अखेर स्थूल नफा रु.२,५८,८५,५४६.३२ एवढा झालेला आहे.

२. निजामपुर शाखा चेअरमन श्री. राजेन्द्रभाई बिहारीलाल शाह यांचे मार्गदर्शनाखाली शाखेचे कामकाज सुरळीत सुरु असून सदर शाखेला ३१ मार्च २०२५ अखेर स्थूल नफा रु.२७,९९,८२०.१४ एवढा झालेला आहे.

३. प्रकाशा शाखा चेअरमन श्री. बळवंतबापु दगडूभाऊ जाधव यांचे मार्गदर्शनाखाली शाखेचे कामकाज व्यवस्थित रित्या सुरु आहे. ३१ मार्च २०२५ अखेर सदर शाखेचा स्थूल नफा रु.१५,३६,३६३.५३ एवढा झालेला आहे.

४. तळोदा शाखा चेअरमन श्री. दिलीपभाई रतिलाल शाह यांचे मार्गदर्शनाखाली सुरु असून शाखा स्वमालकीचा भव्य इमारतीत आहे. सदर शाखेला ३१ मार्च २०२५ अखेर रु.२०,८०,०६९.८१ एवढा स्थूल नफा झालेला आहे.

५. शहादा शाखा चेअरमन श्री. राजेंद्रभाई मोहनलाल जैन यांचे मार्गदर्शनाखाली सुरु असून या शाखेला ३१ मार्च २०२५ अखेर रु.१२,८७,४०८.४८ एवढा स्थूल नफा झालेला आहे.

६. नंदुरबार सिंधी कॉलनी शाखा चेअरमन श्री. सिद्धार्थभाई के. वाणी यांचे मार्गदर्शनाखाली शाखेचे कामकाज सुरळीत सुरु असून सदर शाखेला ३१ मार्च २०२५ अखेर स्थूल नफा रु.१२,८२,६५२.२० एवढा झालेला आहे.

### व्यवस्थापन मंडळ

सर्व संचालक मंडळ सदस्य व व्यवस्थापकिय मंडळ सदस्य यांनी बँकेच्या कामकाजात जबाबदारीने भाग घेवून बँकेची प्रगती साधण्यात मोलाची कामगिरी केलेली आहे. या सर्वांचा मी आभारी आहे. बँकेच्या सर्वांगीण प्रगतीमधे बँकेचे व्यवस्थापकीय अधिकारी व सर्व कर्मचारी वृंद यांचा सिंहाचा वाटा आहे. त्या सर्वांचे मी मनपूर्वक कौतुक करतो.

### शासकिय हिशोब तपासणी

आपल्या बँकेचे शासकिय लेखा परिक्षण मा. मे. व्ही. एस. अग्रवाल अॅन्ड कंपनी, चार्टर्ड अकौन्टंट्स, धुळे यांनी केलेले असून बँकेला सन २०२४-२५ या वर्षासाठी 'अ' ऑडिट वर्ग प्राप्त झालेला आहे.

### रिझर्व्ह बँकेकडील तपासणी

मा. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, नागपुर येथील तपासणी अधिकारी श्री. भावूक आहुजा साहेब, असि. जनरल मॅनेजर यांनी दि.०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२३ पावेतोची तपासणी दि. १५/०१/२०२४ ते २५/०१/२०२४ या कालावधीत केली. त्यांनी बँकेच्या कामकाजाविषयी मौलिक सुचना देऊन योग्य मार्गदर्शन केले व बँकेच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले.

### अंतर्गत हिशोब तपासणी

आपल्या बँकेचे सन २०२४-२५ चे अंतर्गत लेखा परिक्षण मा. मे. राजाराम आर. कुलकर्णी अॅण्ड कंपनी, चार्टर्ड अकौन्टंट्स, धुळे यांनी केलेले असुन बँकेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केलेले आहे.

## सिस्टम ऑडीट

बँकेचे दि. ३१ मार्च २०२५ अखेरचे सिस्टम ऑडीट फिनीक्स टेक्नोसायबर प्रा. लि., अहमदाबाद यांनी केलेले आहे. तसेच मा.रिझर्व्ह बँकेच्या सुचनेप्रमाणे व्ही.ए.पी.टी. आणि आय.एस. ऑडीट देखील त्यांचेकडून करण्यात आले असुन तपासणीचा दोष दूरुस्ती अहवाल देखील पाठविलेला आहे.

## सामाजिक सहभाग

बँक स्थापनेपासून आजपर्यंत सतत सामाजिक बांधिलकी जोपासत आहे. निजामपुर येथे बोअरवेल्स, वृक्षारोपण, सभासदांना आजारपणासाठी मदत तसेच उत्तराखंडातील नैसर्गिक आपत्तीत मदत म्हणून रु.१,५१,०००/- पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधीत मदत केलेली आहे. नंदुरबार शहर व बँकेचे कार्यक्षेत्र यात बँकेने विविध ठिकाणी बोअरवेल्स, सांस्कृतिक सेवाभावी संस्थांना मदत, गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप, मंदिराचे सुशोभिकरण, नंदुरबार शहर व परिसरातील काही आर्थिक दृष्ट्या कमकुवत व्यक्तींना औषधोपचारासाठी मदत देखील केलेली आहे. तसेच मागील वर्षापासुन वृक्षारोपण व संवर्धन या महत्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी सुरु आहे. पाचोराबारी (नंदुरबार) येथे नैसर्गिक आपत्ती (ढगफुटी) मुळे झालेल्या नुकसानीला मदत म्हणून रु. २,०१,०००/-, उमर्दे ता. नंदुरबार येथे पाणी फाऊंडेशनसाठी मदत म्हणून रु. ५१,०००/- तसेच कोविड-१९ निधी अंतर्गत पंतप्रधान मदत निधीत रु.३,००,०००/- उपजिल्हाधिकारी श्री.धनंजय गोगटे सो. आणि मुख्यमंत्री सहायता निधीत रु.२,००,०००/- जिल्हा उपनिबंधक श्री. अशोक चाळक सो. यांचाकडे सुपूर्त केले. बँकेकडून सर्व सभासदांचा ॲक्सीडेंट विमा काढला जात असतो. तसेच मागील वर्षापासून 'मर्चन्टस् बँक आरोग्य योजना'चा शुभारंभ होऊन आजपर्यंत बऱ्याच सभासदांना याचा लाभ झालेला आहे.

## नफा विभागणी

अहवाल वर्षात बँकेला रु.३,४८,७१,८६०.४८ एवढा स्थुल नफा झालेला असुन त्यातुन आवश्यक तरतुदी रु.१,७२,२८,८६०.४८ वजा जाता निव्वळ नफा रु. १,७६,४३,०००.०० ची वाटणी खालील प्रमाणे करावी अशी शिफारस मा.संचालक मंडळाने केलेली आहे.

| स्थुल नफ्यातून तरतुदी | |
|---|---|
| लेखा परिक्षण शुल्क तरतुद | ९,००,०००.०० |
| बुडीत कर्जासाठी तरतूद | २७,००,०००.०० |
| आयकर तरतूद | ६०,००,०००.०० |
| सेवक उपदान तरतूद | ३५,३५,०००.०० |
| कर्मचारी बोनस | २७,३१,०००.०० |
| निवडणूक निधी | ७,५२,४२७.०८ |
| गुंतवणूक घसारा निधी | ६,१०,४३३.४० |
| | **१,७२,२८,८६०.४८** |

| निव्वळ नफ्याची विभागणी | |
|---|---|
| राखीव निधी | ४५,००,०००.०० |
| सभासदांना लाभांश | ६३,४३,०००.०० |
| इमारत निधी | ६८,००,०००.०० |
| | **१,७६,४३,०००.००** |

बँकेचा गुणात्मक विकास होण्यासाठी व्यवस्थापन मंडळ सदैव प्रयत्नशील आहे. समाज जीवन उंचावणे, तळागाळातील लोकांना मदतीचा हात देणे, निकोप, निस्वार्थीपणे नैतिक मुल्ये जोपासत प्रामाणिकपणाने कार्य करणे हीच मर्चन्टस परिवाराची सदैव वाटचाल राहील. बँकेचे सर्व संबंधीत व हितचिंतक सहकार क्षेत्रातील सर्व मान्यवर, बँकेचे संचालक मंडळ, व्यवस्थापकिय मंडळ, वरीष्ठ अधिकारी, कर्मचारी वृंद या सर्वांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. म्हणूनच अल्पकाळात आपण प्रगतीच्या टप्प्यावर येऊन पोहचलो. पुन:श्च सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. भविष्यात देखील सदैव असेच सहकार्य करुन बँकेच्या प्रगतीचा आलेख सदैव उंचावत रहाण्यासाठी आपण सर्व सतत प्रयत्नशील राहू या अपेक्षांसह...

आपला स्नेहांकित - **किशोरभाई वाणी** संस्थापक चेअरमन


हम सभी के पास समान योग्यता नही है लेकिन अपनी प्रतिभा को विकसीत करने के लिए समान अवसर है।

## बँकेच्या सांपत्तिक स्थितीचा आढावा

(रक्कम रु. लाखात)

| तपशिल | १९९५-९६ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|
| एकुण ठेवी | १३०.७१ | १४१९३.०३ | १३११९.४९ | १३९७९.७३ | १४२३७.३९ |
| ठेवीवाढीचा शेकडा दर | --- | २.३९ % | - ७.५६ % | ६.५६ % | १.८४ % |
| सभासदांना कर्जवाटप | ७३.५३ | ८६४२.४५ | ८९२१.६५ | ९७३९.७१ | १०१४८.३० |
| निव्वळ नफा | १.६५ | २०१.४५ | १७४.४० | १३५.१३ | १७६.४३ |
| स्थुल नफ्याचे ठेवीशी शे.प्रमाण | १.२६ % | २.६९ % | २.५६ % | १.७८ % | २.४५ % |
| लाभांश वाटप दर | ९ % | १२% | १२% | १२% | १२% सुचित |
| भाग भांडवल | १३.५७ | ४७१.९४ | ४८४.५६ | ५०८.५६ | ५२६.९८ |
| गंगाजळी | १.३२ | २०८८.४३ | २२६२.१५ | २३६०.०४ | २४८२.७३ |
| गुंतवणुक | ४५.५० | ६०४९.१२ | ५६४७.२६ | ५८१५.७३ | ५९८९.६४ |
| सभासद संख्या | १३५६ | ५२५८ | ५२२० | ५२५७ | ५२६६ |
| खेळते भांडवल | १५०.१९ | १७३४७.२६ | १६४७३.७२ | १७५०८.३५ | १७९५४.२६ |
| पगार/खेळते भांडवल शे.प्रमाण | ०.४७ % | १.३५ % | १.६६ % | १.६८ % | १.७४ % |
| प्रति कर्मचारी व्यवसाय | १८.७७ | ५०९.८२ | ४७९.१६ | ४८४.०७ | ५४१.९० |

## ANNEXURE - 'A'

| | | |
|---|---|---|
| Name of the Bank | : | The Nandurbar Merchant's Co-op. Bank Ltd., Nandurbar |
| Address | : | 1030, Kanhaiya Smruti, Ghee Bazar, Nandurbar - 425412 |
| Registration No. & Date | : | DLE / BNK(0) / 101 / 94-95 / Dt. 28/09/1994 |
| RBI Licence No. & Date | : | UBD / MH / 1108 / P Dt. 07/01/95 |
| Jurisdiction | : | Nandurbar, Dhule, Jalgaon & Nashik District |

| Particulars | | | Amount | Particulars | | | Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Membership : | | Regular | 5266 | Borrowing : | | M. S. C. Bank | - NIL - |
| | | Nominal | 138 | | | Other Bank | - NIL - |
| Paid up Share Capital | | | 526.98 | Investment : | | | 5989.64 |
| Reserve & Other Funds | | | 2482.73 | M.S.C. Bank | | 500.00 | |
| Deposits : | | | 14237.39 | Canara Bank | | 400.00 | |
| | Savings | 4238.65 | | Govt. Securities | | 4589.64 | |
| | Current | 1267.94 | | Mutual Fund | | 500.00 | |
| | Fixed Dep. | 8402.90 | | Audit Class 2024 - 2025 | | | 'A' |
| | Other Dep. | 327.90 | | Total Staff : | Sub Staff | 8 | 45 |
| Advances : | | | 10148.30 | | Other | 37 | |
| | Secured | 9978.02 | | Working Capital | | | 17954.26 |
| | Unsecured | 170.28 | | CD Ratio | | | 71.28 % |
| Total % of Weaker Section | | | 19.05 % | CRAR | | | 20.77 % |
| Total % of Priority | | | 89.52 % | | | | |
| Percentage of Gross NPA | | | 3.60 % | | | | |
| Percentage of Net NPA | | | 0.00 % | | | | |

## सन २०२५–२६ साठी अंदाज पत्रक

| उत्पन्न तपशिल | सन २०२४-२५चे अंदाज | सन२४-२५चे प्रत्यक्ष उत्पन्न | कमी (-) जास्त (+) | सन २०२५-२६चे अंदाज |
|---|---|---|---|---|
| शाखा फंड्सवरील व्याज | १९०.०० | २०२.०७ | १२.०७ | २३५.०० |
| कर्जावर मिळालेले व्याज | ९९०.०० | १०३०.९१ | ४०.९१ | ११०५.०० |
| शासकिय रोख्या वरील व्याज | ३२०.०० | ३०६.४६ | – १३.५४ | ३२०.०० |
| गुंतवणुकीवर मिळालेले व्याज | १००.०० | ८८.९९ | – ११.०१ | १०५.०० |
| कमीशन | १०.०० | ४.२९ | – ५.७१ | ८.०० |
| सर्व्हीस चार्जेस | २०.०० | २०.०० | ०.०० | २५.०० |
| लॉकर्स भाडे | ६.०० | ५.३० | – ०.७० | ७.०० |
| शेअर्स वरील लाभांश | ०.२० | ०.२० | ०.०० | ०.२० |
| शासकिय रोखे विक्रीवरील नफा | ०.०० | ०.११ | ०.११ | ५.०० |
| मिस्लिनिअस इन्कम | ४०.०० | ३९.४० | – ०.६० | ४०.०० |
| ए.टी.एम.कमिशन | ३.०० | २.३५ | – ०.६५ | ३.५० |
| दंडात्मक शुल्क | ०.०० | ६.८६ | ६.८६ | ९.५० |
| **एकूण** | **१६७९.२०** | **१७०६.९४** | **२७.७४** | **१८६३.२०** |

| खर्च तपशिल | सन २०२४-२५चे अंदाज | सन २४-२५चे प्रत्यक्ष खर्च | कमी (-) जास्त (+) | सन २०२५-२६चे अंदाज |
|---|---|---|---|---|
| शासकिय रोख्यांवरील दिलेले व्याज | १०.०० | ०.०० | – १०.०० | १०.०० |
| शाखा फंडावरील व्याज | १९०.०० | २०२.०७ | १२.०७ | २३५.०० |
| ठेवीवरील व्याज | ६६०.०० | ६४२.२२ | – १७.७८ | ७००.०० |
| कर्जावर दिलेले व्याज | २.०० | ३.८६ | १.८६ | २.०० |
| कर्मचारी पगार व भत्ते | ३१५.०० | ३१३.१९ | – १.८१ | ३३५.०० |
| कार्यालय भाडे / कर | २१.०० | २१.२० | ०.२० | २५.०० |
| टपाल,तार,फोन बील,लिझ लाईन बील | ३२.०० | १५.२९ | – १६.७१ | ३२.०० |
| प्रिंटींग व स्टेशनरी | ४.०० | ४.४९ | ०.४९ | ७.०० |
| घसारा | २०.०० | १८.०४ | – १.९६ | २०.०० |
| अल्प बचत एजंटचे कमीशन | २०.०० | १५.८० | – ४.२० | १८.०० |
| भविष्य निर्वाह निधी वर्गणी | ३३.०० | ३२.७७ | – ०.२३ | ४०.०० |
| मा. संचालक मंडळ भत्ते | ३.०० | ३.११ | ०.११ | ३.२५ |
| बँक चार्जेस | २.०० | ०.४६ | – १.५४ | २.०० |
| पेट्रोल, डिझेल व फ्युअल बील | २.०० | १.११ | – ०.८९ | २.५० |
| विमा खर्च | ३५.०० | ३०.६९ | – ४.३१ | ३५.०० |
| फेडरेशन व इतर वर्गणी | १.०० | ०.७६ | – ०.२४ | १.०० |
| प्रवास बील | ४.०० | २.२३ | – १.७७ | ४.५० |
| रिपेअर्स ॲण्ड मेन्टेनन्स | ४.०० | २.२३ | – १.७७ | ५.०० |
| इतर किरकोळ खर्च | ८.०० | ६.२३ | – १.७७ | १२.०० |
| इलेक्ट्रीक बील | ७.०० | ६.५८ | – ०.४२ | ७.०० |
| प्रो. फंड प्रशासकिय खर्च | २.०० | १.७६ | – ०.२४ | २.१० |
| आवश्यक तरतुदी | १००.०० | १७२.२९ | ७२.२९ | १२०.०० |
| कर्मचारी ट्रेनींग खर्च | ५.०० | ०.०० | – ५.०० | ५.०० |
| वार्षिक सभा खर्च | ४.०० | ०.८० | – ३.२० | ३.०० |
| कॉम्प्युटर (संगणक) खर्च | १०.०० | ४.५२ | – ५.४८ | १०.०० |
| प्रिमीयम ॲमोरटाईज | २.०० | ०.९५ | – १.०५ | २.०० |
| प्रोफेशनल फी | २.०० | ०.०० | – २.०० | २.०० |
| गुड्स एन्ड सर्व्हिस टॅक्स | ३.०० | ३.३५ | ०.३५ | ४.०० |
| कॉम्प्युटर ए.एम.सी. | ३.५० | ८.७८ | ५.२८ | १०.०० |
| ए.टी.एम. वर दिलेले कमिशन | १.५० | ०.४८ | – १.०२ | १.५० |
| सल्लागार फी | २.०० | १.४० | – ०.६० | ३.०० |
| सेवक उपदान | ०.०० | १३.६० | १३.६० | १५.०० |
| ऑडीट फी | ०.०० | ०.४८ | ०.४८ | १.०० |
| **एकूण** | **१५०८.००** | **१५३०.७४** | **२२.७४** | **१६७४.८५** |

**सन २०२५–२६ साठी**

| | | | |
|---|---|---|---|
| अपेक्षीत उत्पन्न | रु. | १८६३.२० | लक्ष |
| अपेक्षीत खर्च | रु. | १६७४.८५ | लक्ष |
| **अपेक्षीत निव्वळ नफा** | **रु.** | **१८८.३५** | **लक्ष** |


जिंदगी में जितना ज्यादा पैसा कमाओगे, उतने ही पैसे कमाने के तरीके भी मिलते जायेंगे।

# THE NANDURBAR MERCHANT'S CO-OP. BANK LTD., NANDURBAR

## CONSOLIDATED PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31st MARCH 2025

| 31-03-2024 | EXPENDITURE | | 31-03-2025 |
|---|---|---|---|
| 272551.00 | AMC Charges A/c. | | 878339.50 |
| 128605.00 | Annual Meeting Expences A/c. | | 79790.00 |
| 69760.00 | Annual Subscribtion A/c. | | 75812.00 |
| 41941.05 | ATM Commission Paid A/c. | | 47685.40 |
| 0.00 | Audit Fees A/c. | | 58550.78 |
| 131066.35 | Bank Charges A/c. | | 45532.39 |
| 1603825.00 | Commission to Pigmy Agents A/c. | | 1580341.00 |
| 238424.06 | Computer Expenditure A/c. | | 452201.52 |
| 1723637.00 | Depreciation A/c. | | 1803801.37 |
| 125357.80 | Diesel & Petrol Expenses A/c. | | 110835.00 |
| 216650.00 | Director's Meeting Allowances A/c. | | 311000.00 |
| 599904.82 | Electricity Bill A/c. | | 657734.00 |
| 136189.72 | Goods & Services Tax A/c. | | 335065.07 |
| 3009639.42 | Insurance A/c. | | 3068525.68 |
| 0.00 | Interest Paid on Borrowing A/c. | | 385951.00 |
| 66339269.92 | Interest Paid on Deposits A/c. | | 64220240.50 |
| 18491116.00 | Interest Paid to Branches A/c. | | 20206622.00 |
| 709861.11 | Interest Paid on Govt. Securities A/c. | | 0.00 |
| 39770.00 | Legal Adviser Fees A/c. | | 139610.00 |
